ठळक बातम्या

- वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या रचनेला १५१ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राष्ट्रपतींच्या शुभेच्छा

- ६ व्या हज परिषदेत सहभागी होण्यासाठी केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

- गेला आठवडाभर शेअरबाजारात तेजी

- इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित गुप्त माहिती देणाऱ्याला २ कोटी डॉलरचं बक्षीस देण्याची अमेरिकेची घोषणा

आणि

- न्यूझीलंडबरोबरच्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतापुढे विजयासाठी १३५ धावांचं आव्हान

<><><><><><>

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताच्या रचनेला १५१ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. एका समाजमाध्यम पोस्टद्वारे त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. स्वातंत्र्य चळवळी दरम्यान वंदे मातरम देशभक्तांसाठी धैर्य, एकता आणि दृढनिश्चयाचं स्फूर्ती गीत ठरलं असं त्या म्हणाल्या. आजही हे गीत राष्ट्रीय ओळख, आत्मसन्मान आणि मातृभूमीबद्दल भक्तीचं प्रतीक असल्याचं त्यांनी सांगितलं.

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेल्या या गीताच्या रचनेला १५१ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><><>

कर्करोगाविषयी जागरूकता आणि तपासण्यांच्या सुविधांची उपलब्धता अत्यंत गरजेची असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिनानिमित्त नड्डा यांनी समाजमाध्यमावर एक संदेश सामायिक केला आहे. कर्करोगाची सुरुवातीच्या टप्प्यावरची लक्षणं ओळखणं, वेळेवर तपासणी आणि उपचार घेण्याला प्राधान्य द्यावं असं आवाहन त्यांनी या संदेशातून केलं आहे. नागरिकांना

सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या तोंडाच्या, स्तनांच्या आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या बाबतीत जारी केलेल्या सल्ल्यानुसार नियमित तपासणी करून घ्यावी असं त्यांनी म्हटलं आहे. नागरिकांना तंबाखू आणि दारूचे सेवन टाळावं, नियमित व्यायाम करावा, सकस आहार घ्यावा, यासोबतच कोणतीही असामान्य किंवा टिकून राहणारी लक्षणे आढळली तर वैद्यकीय सल्ला घ्यावा असं त्यांनी म्हटलं आहे. कर्करोगाशी संबंधित तपासण्यांच्या माहितीसाठी आपल्या जवळच्या आयुष्मान आरोग्य मंदिराला किंवा आरोग्य केंद्राला भेट द्यावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

<><><><><>

सौदी अरेबिया मध्ये जेद्दाह इथं तरंगती मशीद म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक अल रहमाह मशिदीला केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी आज भेट दिली. ६ व्या हज परिषदेत सहभागी होण्यासाठी रिजिजू सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असून आपल्या भेटीदरम्यान ते सौदी अरेबिया बरोबर द्विपक्षीय हज करारावर स्वाक्षरी करणार आहेत. त्याआधी भारताचे सौदी अरेबिया मधले राजदूत विपुल यांनी तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेत हज यात्रेच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी जेद्दाहच्या हज टर्मिनल आणि हरामाईन अतिजलद रेल्वे स्थानकाची पाहणी केली. भारताच्या हज समितीच्या माध्यमातून जाणाऱ्या हज यात्रेकरूंसाठी हे महत्वाचं रेल्वे स्थानक आहे.

<><><><><>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने, चार किंवा त्यापेक्षा अधिक मार्गिका असलेल्या राष्ट्रीय महामार्गांवर पथकर वसूली नाक्याची रचना आणि पायाभूत सुविधांचं प्रमाणीकरण करण्यासाठी मार्गदर्शक तत्व जारी केली आहेत. त्यामुळे वाहतुकीच्या वेगाला टोलनाक्यामुळे अडथळा न येता टोलवसुलीही सुलभ होणार असल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. या मार्गदर्शक तत्वांमुळे आगामी आणि सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांमध्ये बहुमार्गिका मुक्त वाहतूक आधारित अडथळामुक्त पथकर संकलन प्रणालीची तरतूद असेल.

<><><><><>

देशांतर्गत शेअर बाजारासाठी सरलेला आठवडा उत्साहाचा राहिल्याचं बाजार विश्लेषकांनी म्हटलं आहे. ६ नोव्हेंबरला संपलेल्या आठवड्याच्या व्यवहारानंतर २७

फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच निफ्टीनं २५ हजार अंकांचा, तर सेन्सेक्सनं ८१ हजार अंकांचा टप्पा पार केल्याचं बाजार विश्लेषकांनी म्हटलं आहे.

या आठवड्याच्या अखेरीला मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ८ पूर्णांक ८२ शतांश टक्के इतकी साप्ताहिक वाढ झाली आणि तो ८१ हजार २८ अंकांवर बंद झाला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ५० देखील ८ पूर्णांक ५८ शतांश टक्क्यांच्या साप्ताहिक वाढीसह २५ हजार ३० अंकांवर बंद झाला.

अमेरिकेतल्या मध्यावधी निवडणुकीनंतर जागतिक बाजारात आलेली सकारात्मकता तसंच अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांच्या कामगिरीबाबत संशयाचं वातावरण निर्माण झाल्यानं, भारतीय बाजारात परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली, यामुळे ही तेजी आल्याचं विश्लेषकांनी म्हटलं आहे. यासोबतच भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं परदेशी गुंतवणूकदारांना दीर्घकालीन भांडवली लाभ करात सवलत देण्याचा प्रस्ताव मांडल्यानंही बाजारात मोठी तरलता निर्माण झाल्याचंही विश्लेषकांनी म्हटलं आहे. या तेजीदरम्यान मोटारवाहन आणि खासगी बँक क्षेत्रातल्या समभागांचे भाव वाढल्याचं निरीक्षणही विश्लेषकांनी नोंदवलं आहे.

दरम्यान, बाजारातल्या अल्पकालीन अस्थिरतेचं मूल्यमापन करणारा इंडिया व्होलॅटिलिटी इंडेक्स १३ पूर्णांक ७१ शतांश टक्क्यानं वधारून १७ पूर्णांक ७२ शतांश टक्क्यावर पोहोचला आहे, यामुळे येत्या काळातही बाजारात चढ उताराचं प्रमाण वाढतं राहण्याची शक्यताही विश्लेषकांनी व्यक्त केली आहे.

<><><><><><>

उत्तर प्रदेशात अयोध्या इथं दीपावलीच्या निमित्ताने आज सलग दहाव्या वर्षी दीपोत्सव साजरा केला जाणार आहे. दिवाळीच्या पूर्वसंध्येला 30 लाखाहून अधिक पणत्या प्रज्वलित करून अयोध्यानगरी उजळवण्यात येणार आहे. या सोहळ्याला उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन उपस्थित राहाणार आहेत. या भेटीत उपराष्ट्रपती श्रीराम जन्मभूमि मंदिरात दर्शन घेणार असून प्रतिकात्मक राज्याभिषेक सोहळ्यात उपस्थित राहतील. या सोहळ्यात रामलीला आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरे होणार असून, त्यात देश परदेशातील अडीच हजार कलाकार सहभागी होणार आहेत.

<><><><><><>

अमेरिकेनं इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित गुप्त माहिती देणाऱ्याला २ कोटी अमेरिकी डॉलरचं बक्षीस देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकन सेंट्रल कमांड या विभागानं समाजमाध्यमावरून याबाबतची घोषणा केली आहे. गरज भासल्यास माहिती देणाऱ्या व्यक्तीचं सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन केलं जाऊ शकतं, असंही या संदेशात म्हटलं आहे.

दुसरीकडे, हे युद्ध संपवण्यासाठी करार करण्याकरता इराण उत्सुक असल्याचा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा केला आहे. याबाबत इराणशी बोलणी सुरू असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीतल्या केश्म बेटावर आपण अमेरिकेचा एमक्यू वन हा टेहळणी आणि लढाऊ ड्रोन पाडल्याचा दावा इरणानं केला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात आयआरजीसी या लष्करी संघटनेच्या हवाल्यानं तिथल्या वृत्तवाहिनीनं या संदर्भातलं वृत्त दिलं आहे. आपल्या हवाई संरक्षण यंत्रणेनं नष्ट केलेला हा अमेरिकेचा १६ वा एमक्यू वन ड्रोन असल्याचा दावाही आयआरजीसीनं केला आहे. मात्र, अमेरिकेकडून इराणच्या या दाव्यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

<><><><><><>

अमेरिकेत व्हाईट हाउसचे चीफ ऑफ स्टाफ म्हणून स्टीफन मिलर यांची नियुक्ती अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केली आहे. मिलर हे ट्रम्प याच्या स्थलांतर धोरणांचे मुख्य सूत्रधार मानले जातात. नुकत्याच झालेल्या मध्यावधी निवडणूकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला मोठा फटका बसला असून, काँग्रेसला दोन्ही सभागृहांवरील नियंत्रण गमवावे लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><><>

सक्तीच्या सेवानिवृत्तीचा आदेश हा शिक्षेसारखा नसून या आदेशामुळे कर्मचाऱ्याच्या वर्तनावर कोणताही आक्षेप घेतला जात नाही, किंवा त्यानं गैरवर्तन केल्याचा निष्कर्ष यातून निघत नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. छत्तीसगड सरकारनं १४पैकी ५ कर्मचाऱ्यांना सक्तीची सेवानिवृत्ती दिल्याप्रकरणी, न्यायमूर्ती मनमोहन आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या पीठानं हा निर्णय दिला. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम ठेवणं हे जनहिताचं नाही, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

<><><><><><>

रशिया आणि युक्रेनमधलं युद्ध थांबवण्यासाठी पुन्हा एकदा चर्चेच्या मार्गाने प्रयत्न सुरु झाले आहेत. येत्या १० आणि ११ नोव्हेंबरला रशिया, युक्रेन आणि अमेरिका अशी त्रिपक्षीय प्रतिनिधीमंडळाची बैठक युएईमधे अबू धाबी इथं होणार असल्याचं वृत्त असून रशियाने त्याला दुजोरा दिला आहे. रशियाला दूरगामी परिणाम करणारा तह हवा असून तात्पुरत्या युद्धबंदीत रस नाही असं रशियानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी यानं कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. मात्र तो मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये भारतातर्फे खेळणार असल्याचं त्यानं समाजमाध्यमावर स्पष्ट केलं आहे. १३ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत शमीनं ६४ सामन्यांत २२९ गडी बाद केले. एका सामन्यात पाच बळी घेण्याची कामगिरीचा त्यानं सहा वेळा केली. कसोटी क्रिकेटमध्ये कपिल देव, झहीर खान, इशांत शर्मा, जवागल श्रीनाथ आणि जसप्रीत बुमराह यांच्यानंतर भारताचा सहावा सर्वाधिक बळी घेणारा वेगवान गोलंदाज अशी शमीची ओळख आहे.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघातल्या पाच एकदिवसीय मालिकेतल्या आजच्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडनं भारतासमोर विजयासाठी १३५ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

वेलिंग्टन इथं होत असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला होता. हा निर्णय सार्थ ठरवत भारताच्या गोलंदाजांनी ४१ षटकांतच न्यूझीलंडचा संपूर्ण संघ केवळ १३४ धावांतच माघारी धाडला. भारताच्या भेदक गोलंदाजीपुढे न्यूझीलंडच्या निम्मा संघ केवळ ५३ धावांतच तंबूत परतला होता. मात्र त्यानंतर डॅरेल मिचेल आणि मिचेल सँटनर यांनी सहाव्या गड्यासाठी ५९ धावांची भागिदारी करत न्यूझीलंडचा डाव सावरला. डॅरेल मिचेल यानं ५५ तर सँटनर यानं ३१ धावा केल्या. मात्र हे दोघे बाद होताच न्यूझीलंडचा डाव पुन्हा गडगडला.

भारताच्या वतीनं गुरनूर ब्रार यानं न्यूझीलंडचे ४ तर अकीब नबी, अंशूल खंबोज आणि अक्सर पटेल यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा १३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना १४ षटकात भारताच्या ४ बाद ४९ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

दुबई तंदुरुस्ती स्पर्धेचा भाग म्हणून भरवण्यात आलेल्या पाच किलोमीटर सामुदायिक धावण्याच्या स्पर्धेचं नेतृत्व संयुक्त अरब अमिरातीचे अर्थव्यवस्था आणि पर्यटन मंत्री अब्दुला बिन तौक अल मारी यांनी केलं. दुबईतल्या भारतीय वाणिज्य दूतावासाने अर्थव्यवस्था आणि पर्यटन मंत्रालयाच्या सहकार्यानं ही स्पर्धा आयोजित केली होती.

<><><><><><>

राज्य दहशतवाद विरोधी पथकानं आज ठाणे जिल्ह्यात ठाकुर्ली इथून एका नक्षली अतिरेक्याला अटक केली आहे. झारखंडच्या पलामू जिल्ह्यातल्या देवगाव इथला रहिवासी असलेल्या या नक्षलवाद्यासाठी दहा लाख रुपयांचं इनाम जाहीर केलं होतं.

<><><><><><>

ठाणे शहरात राबोडी इथं नाशिक - ठाणे महामार्गावर पोलिसांच्या गुन्हे शाखेनं बेकायदेशीर शस्त्रास्त्रांची तस्करी करणारी टोळी उघडकीस आणून पाच जणांना अटक केली आहे.

//<><><><><><>//